

SRJIS

Print ISSN 2319-4766

GLOBALLY INDEXED

IMPACT FACTOR SJIF 2021 7.380






An International Peer Reviewed

Refereed Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

OCT-DEC , 2021. VOL. 10, ISSUE -49

EDITOR IN CHIEF : Prof. Praful. M. Rajurwade

IMPACT FACTOR SJIF 2021 = 7.380
ONLINE ISSN 2278-8808

PRINTED ISSN 2319-4766

*AN INTERNATIONAL, PEER REVIEWED, REFEREED & QUARTERLY*

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

**Editor-In- Chief**

**PROF. PRAFUL M. RAJURWADE**
HOD, Dept. of History, R.T. College, Chimur

**PROF. DR. NITIN T. KATROJWAR**
HOD, Political Science, R. T. College, Chimur

**PROF. PITAMBAR V. PISE**
HOD, Sociology Dept., R. T. College Chimur

**PROF. ASHUTOSH M. POPATE**
HOD, English Dept., R. T. College, Chimur

## Amitesh Publication & Company,

TCG's, SAI DATTA NIWAS, S. No. 5+4/ 5+4, D-WING, Flat No. 104, Dattnagar, Near Telco Colony, Ambegaon (Kh), Pune. Maharashtra. 411046. India.
**Website: www.srjis.com Email: srjisarticles16@gmail.com**

SJIF 2021 = 7.380

PRINTED ISSN 2319-4766

An International, Peer Reviewed, & Refereed Quarterly
**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**

OCT-DEC 2021, VOL-10, ISSUE-49


| Sr. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | **ROLE OF MAHATMA GANDHI IN INDIAN NATIONAL MOVEMENT**<br>*Asst. Prof. Mangesh N. Jamdade* | 1-3 |
| 2 | **NATIONAL EDUCATION MOVEMENT (1890 TO 1905 AND 1920 - 1922) AND EDUCATION IN INDIA BETWEEN 1929-1947**<br>*Dr. Jadal M. M.* | 4-12 |
| 3 | **SOCIAL ENVIRONMENT**<br>*Dr. Rajani D. Shionkar* | 13-14 |
| 4 | **SARVODAYA: MAHATMA GANDHI'S CONCEPT OF UNIVERSAL UPLIFT**<br>*Sudhir Kulkarni & Dr. Sonali Jadhav* | 15-18 |
| 5 | **WOMEN RESERVATION IN INDIA**<br>*Dr. Priya Bhanudas Boche* | 19-22 |
| 6 | **INDIA'S FOREIGN POLICY JAMMU AND KASHMIR**<br>*Dr. Natthu S. Girde* | 23-25 |
| 7 | **STUDY OF VILLAGERS' VIEWS ON TOILET USE UNDER SWACHH BHARAT ABHIYAN REFERENCES: - CHIMUR TALUKA - GONDEDA VILLAGE**<br>*Prof. Pitambar Vithobaji Pise* | 26-28 |
| 8 | **SOCIAL WORK INTERVENTION IN LOCAL SELF GOVERNMENT**<br>*Dr. Swati Kamble & Dr. Chitra S Rajuskar* | 29-34 |
| 9 | **राष्ट्रीय आणिबाणी १९७५: निर्णय व परिणामकारकता**<br>*प्रा. डॉ. नितेश आर. रामटेके* | 35-39 |

| | | |
|---|---|---|
| 10 | रायगड जिल्यातील पेणचे स्वातंत्र्यचळवळीतील योगदान<br>*डॉ. एस. व्ही. पाथरकर* | 40-44 |
| 11 | भारतातील आंबेडकरोत्तर दलित चळवळ<br>*प्रा. सतीश कुंडलिकराव खरात* | 45-48 |
| 12 | मुंबई प्रांतिक कायदेमंडळ स्थापनेचा इतिहास<br>*प्रा. डॉ. उत्तम अप्पासाहेब पठारे* | 49-54 |
| 13 | भारतीय लोकशाहीत मूलभूत हक्कांचे महत्व<br>*दिपाली वैजनाथ आदोडे* | 55-59 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर - महिला सक्षमीकरण<br>*मनिषा यशवंत शिंदे & डॉ. चित्रा राजुसकर* | 60-65 |
| 15 | कोविड १९ चा शिक्षण, अर्थ आणि समाजावरील परिणाम<br>*प्रतिभा वासुदेव गायकवाड* | 66-70 |
| 16 | भारतीय परराष्ट्रीय धोरणाचे शिल्पकार- पंडित नेहरूः एक चिकित्सक अध्ययन<br>*डॉ. सुभाष दौलतराव उपाते* | 71-79 |
| 17 | महान समाजसुधारक स्वामी नारायण गुरु<br>*Dr. Madhukar Vithoba Jadhav* | 80-83 |
| 18 | वारली जमातीची पार्श्वभूमी व समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>*डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर)* | 84-89 |
| 19 | स्त्रीशक्ती आणि महात्मा गांधीचे विचार<br>*कांचन हिलाल देसले & डॉ. जयश्री महाजन* | 90-93 |
| 20 | जगन्नाथ शंकर शेठ<br>*डॉ. उर्मिला क्षीरसागर* | 94-96 |
| 21 | कोविड–१९ चा भारतीय शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम<br>*डॉ. चद्रशेखर रामकृष्ण भेंजे* | 97-102 |
| 22 | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे अमरावती शहरातील सामाजिक कार्य<br>*प्रा. डॉ. संदीप नामदेव मिरे* | 103-105 |

| | | |
|---|---|---|
| 23 | **भारतीय स्वतंत्रता आंदोलन मे महात्मा गांधीजी कि भूमिका (योगदान)**<br>*Dr. Aruna Dinkarrao Nandanwar* | 106-110 |
| 24 | **महात्मा फुले यांचा सामाजिक दृष्टिकोण—एक अध्ययन**<br>*प्रा. डॉ. रफिक बाबामिया शेख* | 111-112 |
| 25 | **शैक्षणिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा ज्योतिबा फुले**<br>*डॉ. शहनाज रफिक शेख* | 113-115 |
| 26 | **प्रसारमाध्यमांचे दलित चळवळीतील योगदान**<br>*प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे* | 116-120 |
| 27 | **भारतीय संसदीय शासनप्रणालीचा विकास एक विश्लेषण**<br>*डॉ. नितीन तु. कत्रोजवार* | 121-125 |
| 28 | **महात्मा फुलेंचे शेतकरी व शेती विषयक विचार**<br>*डॉ. संजय मारोतराव महाजन* | 126-128 |
| 29 | **भारतातील दहशतवादाचे स्वरुप**<br>*आबासाहेब माणिकराव देशमुख* | 129-131 |
| 30 | **महात्मा फुलेंचा सार्वजनिक सत्यधर्म**<br>*डॉ. प्रशांत रामदास बोबडे* | 132-134 |
| 31 | **महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन आणि विदर्भ विकास**<br>*प्रा. वर्षा वैजनाथ चंदनशिवे* | 135-138 |
| 32 | **छत्रपती शिवरायांची जलनीती- एक दृष्टीक्षेप**<br>*डॉ. अरविंद पी सोनटक्के & प्रा. सौ. धनश्री आर कापशीकर* | 139-143 |
| 33 | **कामगार चळवळीचा मार्क्सवादी दृष्टिकोन**<br>*प्रा. विरेंद्र मुरलीधर घरडे* | 144-147 |
| 34 | **स्वतंत्रता संग्राम में सरदार वल्लभ भाई पटेल का योगदान**<br>*डॉ. शुभ्रा मिश्रा* | 148-151 |

# छत्रपती शिवरायांची जलनीती- एक दृष्टीक्षेप

**डॉ. अरविंद पी सोनटक्के**
*मार्गदर्शक, इतिहास विभाग प्रमुख, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर, जि. नांदेड*
*मो.नं ९४२३१३९६७६*

**प्रा. सौ. धनश्री आर कापशीकर**
*संशोधक विदयार्थीनी, सहाय्यक प्राध्यापिका, उमा महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर*
*मो.नं ९४०३१८३४४९*

**प्रस्तावना —**

भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहासातील तेजस्वी पर्व म्हणजे 'शिवकाल' आणि या गौरवशाली व अभिमानास्पद कालखंडाच्या बाबतीत अस्सल साधनांचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. मध्ययुगीन काळातील छत्रपती शिवरायांचे राज्य हे पुरोगामी स्वरूपाचे व लोककल्याणकारी राज्य होते, हे सांगणारे अर्वाचीन ग्रंथ तसे कमीच आहेत. म्हणून उपलब्ध साधनांनुसार छत्रपती शिवरायांचे राज्य हे लोकाभिमुख प्रशासन देणारे होते, हे सांगतानाच त्यांच्या जलनीतीवर प्रकाश टाकणे, हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

छत्रपती शिवरायांच्या कार्यकर्तृत्वाचा इलाखा म्हणजे दख्खन होय. दख्खन, सहयाद्री आणि सहयाद्रितील घाटवाटा हेच त्यांनी केलेल्या राजकीय परिवर्तनाचे केंद्र होते. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा या सर्व ऋतूंमधील वातावरणाचा विचार करून मावळयांची ताकद, घोडे, गनिमी कावा आणि दुर्ग यांच्या आधाराने त्यांनी सहयाद्रिच्या डोंगररांगात मराठी राज्याची निर्मिती केली व तत्कालीन प्रस्थापित असणाऱ्या अदिलशाही, निजामशाही अशा यवनी सत्तांचा प्रतिकार केला. परकीय सागरी सत्तांची दखलही घेतली. उत्तरेतील मुघल बादशाहीशी सतत संघर्ष केला.

**शेतीव्यवसाय व दुष्काळ —**

१७ व्या शतकात भारतात व महाराष्ट्रात लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच होता. त्यांचे जीवनच शेतीव्यवसायाशी निगडीत होते. भारतात शेतीचा प्रारंभ हा इ.स. २५०० पूर्वी झाला. भरपूर पाऊस, सिंधूचे सुपीक खोरे यामुळे शेती विकसीत केली. शेतीला भारताची जीवनरेखा असे अनेकांनी म्हटले आहे. परंतू संपूर्ण भारतातच असंतुलीत पाऊस व त्यामुळे पडणारा दुष्काळ, यामुळे शेती व्यवसाय नेहमी अडचणीत येतो. मानवी जीवनांत पाणी हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. म्हणूनच पाण्यास जीवन असे म्हटले आहे. वेदकाळातही पावसांस 'देवता' मानले गेले. इंद्र व वरूण पर्जन्याची दैवते मानली गेली. जैन धर्मातही पाण्याचा थेंब देखील विनाकारण सांडू नका असे म्हटले गेले.[१]

दुष्काळ हा विविध भागातील लोकांसाठी वेगवेगळा असतो. त्याचे स्वरूप व परिणाम यांतील तीव्रतेतही फरक असतो. दुष्काळ ही नैसर्गीक घटना असली तरीही या काळात मानवी जीवनावर प्रचंड परिणाम होतो. महाराष्ट्रातील दुष्काळाबाबत श्रीनिवास खांदेवाले म्हणतात, दूरदर्शीपणाचा अभाव, अपूरी बांधीलकी, चुकलेला प्राधान्यक्रम, कमी प्रादेशिक अभिनिवेशातून सत्तेचा दुरूपयोग या सगळया घटकांचा संयुक्त परिणाम म्हणजे महाराष्ट्रातील दुष्काळ.[२]

प्राचीन काळापासून भारतात दुष्काळ पडल्याचे अनेक उल्लेख सापडतात. नैसर्गीकदृष्ट्या येणाऱ्या संकटातून ओला किंवा कोरडा दुष्काळ निर्माण झालेला आहे असे ऋग्वेदात म्हटले आहे.

**काले वर्ष तू पर्जन्यः**

**पृथिवी सस्यशालिनी [३]**

१४६० पासून १७९२ पर्यतच्या अनेक दुष्काळांच्या नोंदी आढळून येतात. १६३० मधील दुष्काळाची नोंद दासबोधात सापडते. संत तुकारामांनी ही दुष्काळाचे वर्णन करताना म्हटले आहे,

**"न देखवे डोळा ऐसा हा आकांत!**

**परपीडे चित्त दुःखी होत"**

पुढे संत तुकाराम म्हणतात—

**"दुष्काळे आटिले द्रव्य**

**स्त्री एकी अन्न करिता मेली"[४]**

१६३० च्या शिवजन्मावेळच्या या दुष्काळाला 'थोरला दुष्काळ' असे महाराष्ट्रात म्हटले गेले. १६५० ला संपूर्ण भारतात दुष्काळ पडला होता. पिके वाया गेली. गुरेढोरे मेली. लोक दाही दिशा भटकू लागले. स्त्रीया बालकांची विक्री होऊ लागली. भूकेने लोक मृत्यू पावले. सारा देश प्रेतांनी व्यापला. इतकी भयानकता दुष्काळानी दिली. मात्र प्रशासक म्हणून शिवरायांनी हवामानाचा लहरीपणा लक्षात घेतला आणि जलव्यवस्थापन करण्यावर भर दिला. कारण खुद्द शिवरायांच्या हयातीत अनेकदा दुष्काळ पडल्याची नोंद आहे. उभा महाराष्ट्र त्यातून होरपळून निघत होता. त्यातहूनही छत्रपतीनी जलव्यवस्थापनातून मार्ग काढला कारण अन्न आणि पाणी यांची तीव्र टंचाई म्हणजेच दुष्काळ होय.

**पाणी - महत्वाचे नैसर्गिक संसाधन —**

नैसर्गिक संसाधने अनेक आहेत. परंतू जल हे असे संसाधन आहे की, ज्याचा संबंध संस्कृती, समाज, राजकारण या सर्व अंगाशी भिडलेला आहे. शेती, उदयोगधंदे व व्यापार यांचा विकास, सांस्कृतिक मूल्ये, धार्मीक परंपरा आणि पाण्याची गरज व मागणी या सर्व गाष्टीनी मानवाच्या इतिहासात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक, औदयोगीक, राजकीय विकासात एक प्रभावी घटक म्हणून पाणी वर्षानुवर्षे महत्वाची भूमिका बजावत आहे. जलसमस्या आजही शाश्वत पध्दतीने सोडविता येऊ शकते. जल हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. त्याचे व्यवस्थापन ही तितकेच महत्वाचे आहे. संत ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे की —

**नगरेची रचावी। जलाशये निर्मावी।**

**महावने लावावी । नानाविधे ।[५]**

मध्ययुगात अनेक राजांनी प्रजेला पाण्याची टंचाई भासू नये, वाटसरुंना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी या साठी बारव, विहिरी, आड, पाणपोई यांच्या सुविधा केलेल्या होत्या.

**महाराष्ट्रात शिवरायांपूर्वीचे जलव्यवस्थापन —**

छत्रपती शिवरायांच्या अगोदर महाराष्ट्रात जलव्यवस्थापनाची काही उदाहरणे आहेत. शहाजी राजेंचे पिता मालोजी राजे भोसले यांनी शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेव येथील डोंगरावर पाण्याचा मोठा तलाव बांधला त्यांचे मूळ गाव वेरुळ येथील घृष्णेश्वरा जवळ विहीर बांधली, असा उल्लेख आहे.[६] त्यानंतर शहाजी राजांनीही याच डोंगरावर तळे खोदले.[७]

पुणे, सुपे, चाकण, इंदापूर आणि जुन्नर हा भूप्रदेश शहाजी राजेंची जहागीर होती. नारायणगाव - जुन्नर रस्त्यावर जुन्नर च्या पूर्वेला आफिजबाग नावाच्या गावाजवळ आजही आदशहा तालाब नावाची वास्तू आहे. याच्या पश्चिमेस मानमोडी डोंगररांगांमध्ये पडणारे पावसाचे पाणी नैसर्गिक उतारावरुन एकत्र करुन, मातीचा बांध घालून तलाव केला, मलिकअंबरने खापरी नळाद्वारे या तलावातून व शिवनेरी किल्ल्याजवळील तलावातून पाणी जुन्नर मधील मशीदी मध्ये आणले आहे. ही जलव्यवस्थापनाची सोय आजही वास्तवात आहे. जुन्नर मधील वाड्यांमध्ये आजही 'आड' हा प्रकार आढळतो.[८]

**शिवरायांचे जलव्यवस्थापन —**

आज्ञापत्रात रामचंद्रपंत अमात्य लिहितात - " तैसेचि गडावर आधी उदक पाहून किल्ला बांधावा पाणी नाही आणि ते स्थल तो बांधणी प्राप्त झाले, तरी आधी खडक फोडून तलीटाकी पर्जन्य कालपर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरेल ऐसी मजबूत बांधावी. गडावरी झराही आहे, जैसे तैसे पाणीही पुरते म्हणोनि तितक्यावर निश्चिती न मानावी, उद्योग करावा दोन चार तली टाकी बांधून ठेऊन त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे. गडाचे पाणी बहुत जतन राखावे."[९]

शिवछत्रपतींनी अनेक किल्ल्यांचे सूक्ष्म निरीक्षण करून जलव्यवस्थापन केले व अनेक ठिकाणी पाण्याची पाहणी करूनच दुर्गबांधणी केलेली आहे. किल्ल्यांवर जलकुंभ, संचयिका व तलाव निर्माण करण्यात आले होते. **सिंहगडावर** आपणांस ४८ जलसंचयिका पाहावयास मिळतात, जलपुनर्भरणाचा हा एक अद्वितीय नमुना होय. पावसाळ्यात साठवलेले हे पाणी संपूर्ण गडावरील लोकांसाठी सहा महिने पुरत असे. रायगडावर ३९ जलसंचयिका आढळतात. कधी खडक फोडून तर कधी स्फोट करून पाण्याचे झरे खुले केले जात असत.

**रायगडावरील जलव्यवस्थापन —**

स्वराज्याची राजधानी रायगडाने स्वराज्यबांधणी व स्वराज्य विस्तारासाठी छत्रपतीना, मावळ्यानां खूप मोठी साथ दिली. रायगडाच्या साक्षीने त्यांनी अनेक विजय मिळवले. रायगडावर राज्याभिषेकही झाला. याच रायगडावर जलव्यवस्थापनही छत्रपतींनी केले.

रायगडावर ८ तलाव आहेत. त्यापैकी गंगासागर तलाव, कोळीम तलाव, कुशावर्त तलाव, हत्ती तलाव, काळा तलाव हे सध्या अस्तीत्वात आहेत. त्यातील गंगासागर तलाव हा सर्वात मोठा असून राजवाड्यासमोर बांधण्यात आलेला आहे. मंदिरे, राजवाडा, सेवकांसाठी निवास अशा ३०० इमारती रायगडावर बांधण्यात आलेल्या होत्या. या सर्वांना लागणारा पाणीपुरवठा उत्तम जलव्यवस्थापनाने शक्य झाला. तसेच या सर्व इमारतीसाठी लागणारा दगड गंगासागर आणि इतर तलावातील खाणीतून काढलेला आहे. या तलावांच्या बरोबरच जवळपास पाऊणशे पाण्याच्या टाक्या संपूर्ण गडावर खोदलेलया आहेत. असे म्हणतात १०,००० शिबंदीला पुरून उरेल एवढा प्रचंड पाणीसाठा रायगडावर होता. राज्यभिषेकावेळीही पाण्याची कमतरता भासली नाही. रायगडावर १६७३ मध्ये आलेल्या इंग्रज आधिकारी थॉमस निकोलसने लिहिले आहे. 'पाण्यासाठी रायगडावर मोठे तलाव असून ते पावसाळ्यात भरल्यानंतर पाणी पुरून उरेल इतके होते'.[१०]

रायगडावर काही जोडटाकी सुध्दा आहेत. हनुमान टाके हे त्यातील एक उदाहरण. बारा टाकी हे येथील जलसंचयाचे उत्तम उदाहरण आहे. खडकांत खोदलेले २६ टाके रायगडावर आहेत. काही टाक्यांची रचना स्नानगृहे व शौचकूप यांसाठी केलेली आहे. छत्रपतींच्या वाड्याच्या

दक्षिणेस एका द्वारास लागून एक चिरबंदी हौद आहे. हौदाच्या तळाशी दगडांच्या जाळ्या आहेत. हा विसर्ग मात्र बाहेरच्या बाजूस असलेल्या शौचकूपांच्या जलविसर्गाशी थेट केलेला आहे.

रायगड जिल्ह्यातील सर्व गड यांवर पाणी साठवून टाक्यात सोडणे, तलाव खोदणे इ. उपाय कलेले आहेत. **खांदेरी, उंदेरी, पद्मदुर्ग, सुवर्णदुर्ग** या सर्व गडांवर अशा टाक्या आहेत. **उंदेरी** किल्ल्यावर तीन टाकी आहेत. **कुलाबा** या किल्ल्यावर गणेश मंदिरासमोर चारही बाजूंनी बंदिस्त असा तलाव आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील १८ गडांपैकी **जयगड, गोपाळगड, पूर्णगड** या गडांवरील जलव्यवस्थापन उत्तम आहे. जयगडावरील बालेकिल्ल्यात ३ विहीरी आहेत. या गडाच्या समुद्रकाठी कातावळात बांधून काढलेली गोड्या पाण्याची विहिर आहे. पूर्णगडासाठी मात्र पाण्याची सोय दरवाज्या बाहेरील विहीरीतून केलेली आहे. या गडावर पाणी नसल्यामुळे छत्रपतींनी फारसे गडाकडे लक्ष दिले नाही असे स्पष्ट दिसते. **खांदेरी** किल्ल्यावर दोन पाण्याच्या टाक्या आहेत. ही टाकी जिवंत झरे असलेल्या पाण्याची नसून पावसाळ्यात साठवलेल्या पाण्याची आहेत. बेटावर पडलेले पावसाचे पाणी साठवून टाक्यावर वळवण्यात आलेले आहे. **पद्मदुर्गावरील** ४ पैकी २ हौदात आजही भरपूर पाणी आहे.

**हरिश्चंद्रगड** हा किल्ला शिवरायांनी बांधलेला नाही. १६७० ला तो जिंकून घेतला होता. या गडावरील हरिश्चंद्र मंदिराच्या मागील बाजूस लेण्या आहेत. तेथेच पाण्याने तुडुंब भरलेली टाकी आहे. ही टाकी मराठ्यांनी सुरक्षीत ठेवल्यामुळे आजही तेथील नैसर्गिकरित्या येणाऱ्या पाण्याचे महत्व वाटते.

शिवरायांनी **पाचाड** येथे जिजाऊंसाठी वाडा बांधला. त्यात दोन विहिरी आहेत. एका विहिरीला उतरण्यासाठी दगडी पायऱ्या असून त्यावर बसण्यासाठी दगडी बैठक आहे. आज ही विहिर 'तक्क्याची विहिर म्हणून पर्यटनाचे ठिकाण बनले आहे. शिवकाळात शेतीला पाणी पुरवठ्यासाठी ओढे, नाल्यांवर किंवा जिथे जिथे पाण्याची साठवणूक होते, तिथे तिथे बंधारे बांधून त्यातील पाणी पाटस्थळाच्या आधारे शेतीस पुरवले जात असे. मोटस्थळाच्या आधारेही पिके घेण्यास शेतकऱ्यानां प्रेरित केले जात असे. याबरोबरच छोट्या ओढ्यनां बांध घालून पाणी पुरवले जात असे. यांस फुग्याखालील जमीन असे म्हटले जाई. हे तिनही जलसिंचनाचे प्रकार शिवकाळात वापरण्यात येत असत.

**निष्कर्ष —**

१) शिवरायांनी पाणी हा मानवी जिवनाचा अविभाज्य भाग असल्याने पाण्याची पाहणी करूनच दुर्गबांधणी केली.

२) पाणी ही गडावरील संपत्ती मानूनच पाण्याची साठवणूक व जपणूक केली जाई.

३) पर्यावरण ही संकल्पना स्पष्ट नव्हती अशा काळात, जलनितितून पर्यावरणाचे संवर्धन छत्रपतीनी केले.

४) आजही महाराष्ट्रातील शेकडो किल्ले जलसंवर्धनाचा हा वारसा टिकवून आहेत.

५) कृषीव्यवस्थेतही शिवरायांनी जलसिंचनाचे विविध प्रकार उपयोगात आणलेले दिसून येतात.

६) आज्ञापत्रात म्हटल्याप्रमाणे पूढील पिढ्यांना आपण वने व पाणी या चिरंतन गोष्टीच देणार आहोत याची प्रचिती छत्रपती शिवरायांच्या जलनितीमधूनच दिसून येते.

७) पुढे येणाऱ्या दुष्काळातील जलसमस्यांचा वेध घेऊनच शिवरायांनी बारमाही पाण्याचे नियोजन केलेले दिसते. ही त्यांची दूरदृष्टी होती.

## संदर्भ सूची


१) शहा सुरेखा, महाराष्ट्राचे जनक भाग - १, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली १ली आवृती २००६ पृष्ठ ९
२) खांदेवाले श्रीनिवास, सकाळ, रविवार सप्तरंग पुरवणी, दुष्काळ पेराल तर दुष्काळ उगवेल, ५ ऑगस्ट२०१२वेबआवृती http://online1 E sakal.com/ esakal/20120805/5171530856379668 48 html.
३) पाटणकर भारत , फडणीस जगन, दुष्काळ व दुष्काळ निर्मूलनाचे लोकशास्त्रीय प्रकाशन, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी १९९२ पृष्ठ- १
४) नेमाडे भालचंद्र ( भाषांतर, चंद्रकात पाटील ) तुकाराम, साकेत प्रकाशन, औरंगाबाद २०१० पृष्ठ- ३५
५) ज्ञानेश्वरी, अध्याय १४, श्लोक ३३
६) खरे ग.ह. संपादक- कुलकर्णी अ. रा. मराठ्यांचा इतिहास खंड-१ पुणे १९५० पृष्ठ १३
७) ढेरे रा. चि. शिखरशिंगणापूरचा श्री शंभू महादेव पुणे २००१ पृष्ठ ९५
८) डॉ गायकवाड लहू कचरू, शिवकालीन जलनिती, सनय प्रकाशन पुणे २०२० पृष्ठ १६,१७
९) रामचंद्रपंत अमात्य, आज्ञापत्र आणी राजनिती, संपादक, जोशी श.ना. कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे १९६० पृष्ठ ४७,४८
१०) अक्कलकोटे सतीश, दुर्ग, सह्याद्रि दुर्गभ्रमण मंडळ. सांगली २००९ पृष्ठ ९५